मालेगाव महानगरपालिका,मालेगाव
मौलाना अब्दुल कलाम आझाद भवन,मालेगाव
जि. नाशिक ☎ : (02554) 231800/01
E-mail: mlgpmay@gmail.com

जा.क्र.मामनपा/आयएचएसडिपीविभाग/१५८ /२०२५ दिनांक:-२४/०७/२०२५

प्रती
मा. विभाग प्रमुख
ई-प्रशासन विभाग
मनपा मालेगाव

विषय — महाराष्ट्र शासनाच्या 150 दिवसीय कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयएचएसडिपी विभागातील योजनांची माहिती सादर करणेबाबत..

संदर्भ — मा. उपायुक्त (मु.) यांचे आदेश जा.क्र. मामनपा/ई.प्र.वि./115/2025 दि. 15.07.2025 अन्वये.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आयएचएसडिपी विभागातील प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेची माहिती विहित नमुन्यात व शासन निर्णय व फोटो सोबत देण्यात येत आहे.

उपअभियंता
आयएचएसडिपी विभाग

**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**
**प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 1.0**

- **शासन निर्णय :-**

"सर्वांसाठी घरे योजना 2022" शासन निर्णय क्र.प्रआयो-2015/प्र.क्र.110/गृनिधो-2(सेल) दिनांक 09 डिसेंबर 2015 अन्वये प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मालेगाव महानगरपालिकेची निवड करण्यात आली आहे.

- मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यासाठी मा.महासभा ठराव क्र. 139 दिनांक 04/06/2016 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. 04 आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यास वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC/NC) अंतर्गत मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सादर केलेल्या एकुण ०६ सविस्तर प्रकल्प अहवालातील 1040 अंतिम पात्र लाभार्थ्यांना शासनाने मंजुरी दिली आहे.

- प्रधानमंत्री आवास योजनेत राज्य शासनाकडुन 1 लक्ष व केंद्र शासनाकडुन 1.5 लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे.

- मंजुर 1040 लाभार्थ्यांपैकी 948 लाभार्थ्यांनी महानगरपालिकेस बांधकाम परवानगी सादर केलेली आहे. 948 लाभार्थ्यांना राज्य केंद्र शासनाचे प्राप्त अनुदान पैकी प्रथम टप्पा – 948 लाभार्थी , दुसरा टप्पा – 460 लाभार्थी , तिसरा टप्पा – 430 लाभार्थी व अंतिम टप्पा 206 लाभार्थी असे विविध टप्प्यात केंद्र व राज्य शासनाचे एकुण – 1632 लक्ष अनुदान मनपा मार्फ़त वितरीत करण्यात आले आहे.

- मालेगाव महानगरपालिका प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी सादर करुन अनुदान वितरीत लाभार्थ्यांपैकी 525 घरकुले पुर्ण असुन सदरील लाभार्थी आपल्या हक्काच्या पक्क्या घरात राहण्यासाठी गेलेल आहेत.

- उर्वरीत घरकुले विविध टप्प्यात प्रगतीत असुन त्यांना घरकुलाच्या बांधकाम प्रगतीच्या आधारावर अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

**उपअभियंता**
आयएचएसडिपी विभाग

**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**
**प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0**

- **शासन निर्णय :-**

  "प्रधानमंत्री आवास योजना " शासन निर्णय क्र.गृहनिर्माण विभाग प्रआयो-2024/प्र.क्र.87/गृनिधो-2(सेल) दि.15/10/2024 अन्वये प्रधानमंत्री आवास योजना शासन निर्णय पारित करण्यात आला आहे.

- मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना 2.0 राबविण्यासाठी प्रशासक दप्तरी ठराव क्र. 234/2024-25 दिनांक 03/01/2025 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत केंद्र शासनाने नागरीकांना नविन अर्ज सादर करणेसाठी https://pmaymis2_2024.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणेबाबत सुचित केले आहे.

- प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत BLC घटकाअंतर्गत राज्य शासनाकडून 1.0 लक्ष व केंद्र शासनाकडून 1.5 लक्ष असे एकुण 2.5 लक्ष अनुज्ञेय आहे.

- मालेगाव महानगरपालिका मालेगाव प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत मनपाच्या पोर्टलवर आजपावेतो एकुण 746 इच्छुक अर्जदारांनी अर्ज दाखले केले आहे.

- मनपास BLC घटकाअंतर्गत दाखल केलेल्या 564 अर्जदारांपैकी 266 अर्जदारांचे अर्ज छाणणी करण्यात आली आहे.

- एकुण छाणणी केलेल्या अर्जांपैकी 227 अर्जदारांचे प्रत्यक्ष घरकुलाच्या जागेवर जाऊन Geotagging करण्यात आले आहे.

- एकुण Geotagging केलेल्या घरकुलांपैकी अंतिम पात्र 188 लाभार्थ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे. सदरील अहवालास शासनाची मान्यता मिळाल्यास सदरील लाभार्थ्यांनाकडून आवश्यक असलेली बांधकाम परवानगी घेऊन अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

- प्रलंबित अर्जांपैकी १३५ अर्ज महानगरपालिकेस आवश्यक कागदपत्रांसहित प्राप्त नाहित सदरील अर्जादारांना संपर्क करुन अर्ज मागविण्याचे काम सुरु आहे. उर्वरीत अर्जदारांचे – कागदपत्रे पुर्तता, क्षेत्र कमी, सामाईक क्षेत्र , गुंठेवारी जागा , घरकुलाचे कामे पुर्ण इ. कारणांमुळे अर्ज प्रलंबित आहेत.

उपअभियंता
आयएचएसडिपी विभाग

## मालेगाव महानगरपालिका, मालेगाव
## शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूलन करणेबाबत

- शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकुलन करणेबाबत नवि- एमयुएन-२०१८/प्र.क१९७/नवि-१८ दि. १७.११.२०१८ अन्वये शहरातील एकुण ३६ शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकुलन करणेबाबत मोजणी व सर्व्हेक्षण करण्यात आले.

- वरील पैकी शहरातील हिम्मत नगर, साने गुरुजी नगर, श्रीकृष्ण नगर, पंचशील नगर, जुनी भिलाटी, रचना नगर, सोयगाव इंदिरा नगर, लक्ष्मीवाडी संगमेश्वर, महात्मा गांधी नगर, द्याने, गणेश नगर, द्याने, द्याने गावठाण आंबेडकर नगर, चंद्रमणी नगर द्याने, आदिवासी नगर, द्याने येथील एकुण ५०० चौ. फु. आतिल १९६३ अतिक्रमण धारकांना नियमित करण्यात आले आहे.

- उर्वरीत सायने बु. गट नं. ०१ टप्पा ०१ , दरेगाव गावठाण व अचानक नगर, महात्मा फुले नगर द्याने येथील एकुण १५२२ अतिक्रमण धारकांचे अतिक्रमणे नियमानुकुलन करणेकामी मोजणी व सर्व्हेक्षण करुन उपअधिक्षक भुमी अभिलेख, मालेगाव यांना प्रमाणीत करणेकामी दि. ०२.०५.२०२५ रोजी सादर

- उप अधिक्षक भुमी अभिलेख यांच्या कडून दि.०४.०६.२०२५ रोजी मालेगाव महानगरपालिकेस सायने दरेगाव येथील नकाशे तपासणी व प्रमाणित करुन सादर

- प्रमाणित केलेले नकाशे दि. ०६.०६.२०२५ रोजी सहा. संचालक नगररचना नाशिक यांच्या अभिप्राय कामी सादर..

उपअभियंता

आयएचएसडिपी विभाग